// राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१
फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

**निवडणूक महत्वाचे**

जा.क्र.रासनिप्रा/निवडणूक प्रकिया/परिपत्रक/४७७/२०१५.
दिनांक : १४ /०१/२०१५.

## -: परिपत्रक :-

सहकारी संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूका घेणे, नैमित्तिक रिक्त पदे भरणे, व पदाधिका-यांच्या निवडणूका घेणे या बाबी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे विहित आहेत. सदर निवडणूका या महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे तरतुदीनुसार घ्यावयाच्या आहेत.

उक्त नमूद अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार प्राधिकरणाने या निवडणूका पार पाडणेचे दृष्टीने आवश्यक ते आदेश, मार्गदर्शक सुचना आणि परिपत्रके निर्गमित केलेली आहेत, जेणेकरून निवडणूक प्रक्रिया सुरळीत, भयमुक्त वातावरणात, नि:पक्षपाती व पारदर्शक पध्दतीने पार पाडल्या जाऊ शकतात. त्यासाठी प्राधिकरणाने जे धोरण निश्चित केले आहे त्यात प्रामुख्याने,

i. निवडणुका मोकळया, भयमुक्त व पारदर्शक पध्दतीने तसेच नि:पक्षपतीपणे पार पाडणे.
ii. मतदार यादी ही अचुक, निर्दोष, व्यापक प्रसिद्धीसह नियमानुसार तयार करणे.
iii. मतदानाची टक्केवारी वाढविण्याचा प्रयत्न करणे.
iv. मतदानासाठी ओळखपत्र अनिवार्य असणे व आचारसंहितेचे पालन करणे.

हया बाबींचा समावेश होतो.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने निवडणूक नियमातील 'अ','ब','क' व 'ड' वर्गवारीतील संस्थांचे प्राथमिक मतदार यादीचे अर्हता दिनांक घोषित करुन त्यांची निवडणूकीस पात्र असलेल्या सर्व सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया तात्काळ प्रभावाने सुरु करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. राज्यात निवडणूक प्रक्रिया सुरु झालेल्या असून काही सहकारी संस्थांच्या निवडणूकींचे निकाल लागले आहेत. निवडणूक निकालांचा कल पाहता बहुतांश सहकारी संस्थांच्या निवडणूका बिनविरोध होत आहेत, असे या प्राधिकरणाच्या निर्दशनास आलेले आहे. त्याचप्रमाणे प्राधिकरणाने 'अ','ब','क' व 'ड' वर्गवारीसाठी मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. तथापि, पार पडलेल्या निवडणूकीच्या प्रक्रियेमध्ये खालील प्रमाणे सर्वसाधारण त्रुटी असल्याचे निदर्शनास येत आहे.

i. प्राथमिक मतदार यादया व निवडणूक कार्यक्रमाची प्रसिद्धी पुरेशी होत नाही.
ii. प्राथमिक मतदार यादया व निवडणूक कार्यक्रम मार्गदर्शक सुचनेप्रमाणे प्रसिद्ध होत नाही. त्याचप्रमाणे या संबधाने वर्तमान पत्रातही बातमी स्वरुपात प्रसिद्ध होत नाही.
iii. प्राधिकरणाने निवडणूक निधी विषयी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे निवडणूक निधीची मागणी प्रथम २५ % करणे अपेक्षीत असताना संपूर्ण निवडणूक निधी मागितला जातो. तसेच या प्राधिकरणाने आदेशाव्दारे निर्गमित केलेल्या निवडणूक निधीपेक्षा जादा निधी रक्कमेची मागणी केली जाते.
iv. निवडणूकीच्या प्रयोजनार्थ नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना पुरेशा प्रशिक्षणाचा अभाव दिसून येतो.

v. सहकारी संस्थांच्या प्राथमिक मतदार यादया सादर करत असताना नियमाप्रमाणे पात्र सभासदांची नावे समाविष्ट केली जात नाही.

vi. 'क' वर्गातील सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम निवडणूक नियमातील तरतुदीप्रमाणे मंजुर केला जात नाही.

vii. निवडणूक नियमातील तरतुदीनुसार मतदार संघानिहाय प्राथमिक मतदार यादया स्विकारल्या जात नाही.

viii. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी संस्थेच्या कार्यक्षेत्रात पुरेशा मतदान केद्रांची संख्या मतदारांच्या सोयीच्या दृष्टिने केली जात नाही.

ix. वरील सर्व त्रुटी कोणत्याही निवडणूकीत राहणार नाहीत हयाबाबत दक्षता तसेच खातरजमा प्रत्येक जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे. हयाबाबत झालेले दुर्लक्ष/हलगर्जीपणा याची प्राधिकरणाकडून गांभिर्याने दखल घेतली जाईल.

या निवडणूका सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी खालीलप्रमाणे कृती केल्यास या निवडणूका निर्विघ्न व पारदर्शक पध्दतीने होऊ शकतात. सबब खालील नमूद कृतीचे तंतोतंत पालन करणेबाबत प्राधिकरण निर्देश देत आहे.

**I) निवडणूक पुर्व :-**

(i) संबंधित निबंधकाने त्यांचे अधिकार क्षेत्रातील/ कार्यक्षेत्रातील सर्व सहकारी संस्थांची यादी तयार करून ज्या संस्थांच्या समितीची मुदत संपली आहे त्या संस्थांची यादी स्वतंत्ररित्या करावी.

(ii) निवडणूकीस पात्र संस्थांचे यादीतील कार्य स्थगित/बंद संस्थांवर उचित वैधानिक कार्यवाही करावी, जेणेकरून या संस्थांची निवडणूक घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(iii) तदनंतर निवडणूकीस पात्र संस्थांची निवडणूक नियम ४ अन्वये 'अ','ब','क' व 'ड' अशी विगतवारी करावी.

(iv) सबंधीत संस्थेकडुन ई-१ व ई-२ नमुण्यातील माहीती प्राप्त करुन घ्यावी. संस्थेने ई-२ नमुना सादर न केल्यास व निवडणुकीस पात्र असल्यास तिचे नाव नियम ५ प्रमाणे समाविष्ट करावे.

(v) संस्था प्रकार निहाय निवडणूकीस पात्र सर्व सहकारी संस्थांचे सचिव/व्यवस्थापक/मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बैठक आयोजित करून मतदार यादया निर्दोष कशा कराव्यात याचे मार्गदर्शन करावे. प्रामुख्याने कलम २६, २७, ७३ कअ, १४६, १४७ याबाबत मार्गदर्शन करावे, जेणेकरून प्राथमिक मतदार यादया निर्दोष होऊ शकतील. प्राथमिक मतदार यादी निवडणूक नियमातील इ-३ नमुन्यातच, मराठीत डिजीटल व हार्ड कॉपी तयार करणेस्तव सांगावे. त्याचप्रमाणे वाढीव शेअर्स रक्कम दिलेल्या मुदतीत भरणा करणे व थकबाकी भरणा करणेस्तव संबंधीत सभासदास नोटीस देऊन पुरेशी संधी देणेबाबतची संस्थेने कृती करणे अतिशय आवश्यक आहे ही बाब त्यांना अवगत करावी. मतदार यादी कार्यक्रमाची व्यापक प्रसिद्धी अनिवार्य आहे.

(vi) निवडणूकीस पात्र सहकारी संस्थांची संख्या व वर्गवारी विचारात घेऊन मनुष्यबळाचे नियोजन जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याने संस्थानिहाय तयार करावे. त्यासाठी शासनाचे सर्व विभागाचे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे, सहकारी संस्थांचे अधिकारी/कर्मचारी नियम ३ (i) प्रमाणे निवडणूक कामकाजासाठी नेमता येतात, त्या दृष्टीने नियोजन पूर्ण करावे.

(vii) निवडणूक प्रयोजनार्थ नेमण्यात येणारे सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे सर्वंकष प्रशिक्षण सत्र जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याने आयोजित करावे. त्यात

- सर्व संबंधितांस राज्य निवडणूक प्राधिकरणाचे निवडणूक घेण्याबाबतचे धोरण सविस्तरपणे विशद करण्यात यावे. (हयात निवडणूका मोकळया, भयमुक्त वातावरणात, नि:पक्षपातीपणे, पारदर्शक पद्धतीने घेणे, मतदार यादी अचूक, निर्दोष, पारदर्शक पध्दतीने अंतिम करणे; मतदान करताना ओळखपत्र अनिवार्य असणे, मतदानाची टक्केवारी वाढविण्याचा प्रयत्न करणे, निवडणूक कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी देणे.)
- कायदयातील कलम ११, २४, २५, २५अ, २६, २७, ३५, ४८, ७३, ७३अ, ७३अअअ, ७३ब, ७३क, ७३कअ, ७३कब, ७३ड, ७३फ, ७३आय, ७५, ७६, ७७अ, ७८अ, ७९अ, १४६, १४७, आणि १५२अ या कलमांतील तरतुदींचे उहापोह करून त्याची प्रत दयावी.
- निवडणूक नियमातील नियम ३, ४, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, ७५, ७६, ७७ या तरतुदींचा उहापोह करून त्याची प्रत दयावी.
- संस्थेचे मंजूर उपविधीतील निवडणूकीशी संबंधीत सर्व तरतुदींचे विवेचन करून त्याची प्रत दयावी.
- प्राधिकराणाने निर्गमित केलेल्या आदेश/परिपत्रक/ मार्गदर्शक सुचना/ स्पष्टीकरणे यांचा उहापोह करून त्याची प्रत दयावी.

## II) **प्राथमिक मतदार यादी टप्पा :-**

(i) संस्थेने कायदा, नियम, निवडणूक नियम, उपविधीतील तरतुदी व प्राधिकरणाने दिलेले आदेश/मार्गदर्शक सुचना/परिपत्रके यांचा विचार करून नमुना आय नोंदवहीवरून अर्हता दिनांकावर सभासद असल्याची प्राथमिक मतदार यादी तयार करावी व संबंधीत सहकारी निवडणूक अधिका-याकडे त्यांनी दिलेल्या मुदतीत, प्राधिकरणाने विहीत केलेल्या प्रमाणपत्रासह इ-३ नमुन्यात सादर करावी.

संस्थेने प्रारुप मतदार यादी दिली नाही तर नियम ६(४) किंवा ९(४) अन्वये कार्यवाही करुन प्रारुप मतदार यादी मिळवावी.

(ii) सदर प्राप्त प्राथमिक मतदार यादीची प्रसिध्दी व्यापक स्वरूपात होणे, संस्थेचे निवडणूक पारदर्शक होणेचे दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे ही यादी खालीलप्रमाणे प्रसिध्द करावी.

- संबंधीत निबंधकांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर
- संबंधीत सहकारी संस्थेचे नोटीस बोर्डवर
- संबंधीत ग्रामपंचायत अथवा तलाठी कार्यालय/तहसील कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय
- संबंधीत संस्थांच्या शाखा कार्यालयात (असल्यास)

उपरोक्त प्रमाणे प्रसिध्द केलेल्या यादीचा पंचनामा करावा त्यावर संबंधीत संस्थेचे सचिव/व्यवस्थापक, गामसेवक, तलाठी, संस्थेचे सभासद, इतर नागरिकांचे स्वाक्षरी घ्यावी व त्या पंचनाम्याची फोटोप्रत भ्रमणदुरध्वनीत काढून ठेवावी. /आवश्यक तेथे गावपातळीवरील संस्थांची निवडणूक असल्यास दवंडी देणे. त्याचप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रात प्राथमिक मतदार यादी प्रसिध्दीची बातमी जिल्हा माहिती अधिका-यामार्फत प्रसिध्द करावी.

ज्या संस्थांची निवडणूक घ्यावयाची आहे त्यांचे कार्यक्षेत्रातील लोकप्रतीनिधींना त्याबाबत शक्यतो आगाऊ अवगत करावे.

'अ' व 'ब' वर्गातील सहकारी संस्थांचे मतदार यादीचा कार्यक्रम स्थानिक व संस्थेच्या कार्यक्षेत्रातील वर्तमानपत्रात जिल्हा माहिती अधिकारी यांचे मार्फत संस्थानिहाय स्वतंत्र प्रसिध्द करावा. तर 'क' व 'ड' वर्गातील संस्थांबाबत १० ते १५ संस्थांच्या एकत्रितरित्या बातमी स्वरूपात प्रसिध्दी दयावी.

**III) अंतिम मतदार यादी टप्पा :-**

i. निवडणुक नियमातील तरतुदीनुसार आलेले आक्षेपांची योग्य ती चौकशी करुन जिल्हा / तालुका / प्रभाग सहकार निवडणुक अधिकारी किंवा निवडणुक निर्णय अधिकारी ('क' वर्गाबाबत) यांनी निर्णय मुदतीत घ्यावा व लेखी स्वरुपात आक्षेप कर्त्यास कळवावा. तद्नंतर अंतिम मतदार यादी तयार करुन प्रसिध्द करावी. सदर प्रसिध्दी ही वर नमुद केले प्रमाणे वेबसाईटवरही जिल्हा / तालुका / प्रभाग सहकार निवडणुक अधिकारी यांनी प्रसिध्द करावी.

ii. अंतिम मतदार यादीचा टप्पा चालु असताना निवडणुक निर्णय अधिकारी नेमणुकीचा प्रस्ताव जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी प्राधिकरणास सादर करावा. म्हणजेच अंतिम मतदार यादी होणे पूर्वी असा प्रस्ताव प्राधिकरणास मिळाला पाहिजे./ हया संदर्भात प्राधिकरणाशी थेट संपर्क सातत्याने ठेवावा.

iii. ज्या निवडणुक निर्णय अधिका-याची नेमणुक केलेली आहे, त्याने निवडणुक कार्यक्रम निवडणुक नियम १८ प्रमाणे मंजुरीसाठी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचे मार्फत अंतिम मतदार यादी प्रसिध्दीचे दिनांकावर अथवा लगतच्या दिवशी प्राधिकरणास खास दुतामार्फत पाठवावी.

iv. अंतिम मतदार यादी प्रसिद्धीच्या दिनांकापासुन १० दिवसांनंतरचे लगतचे तारखेस निवडणूक कार्यक्रम वर्तमान पत्रात प्रसिद्ध ('अ' व 'ब' वर्ग संस्थाबाबत) करावा. म्हणजेच अंतिम मतदार यादीस किमान दहा दिवस प्रसिद्धी देणे अत्यावश्यक आहे. त्यानंतर निवडणूक कार्यक्रम सुरु होईल.

v. वाढीव मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात यावी व मतदार यादीचे त्यानुसार प्रकाशन करणे गरजेचे राहील.

**IV) निवडणूक कार्यक्रम टप्पा :-**

i. निवडणूक नियमातील तरतुदीनुसारच निवडणूकीचा कार्यक्रम तयार करुन निवडणुक निर्णय अधिकारी यांनी प्रधिकरणाची मंजूरी घेऊन जिल्हा निवडणुक अधिकारी यांचे मार्फत संस्थेचे कार्यक्षेत्रातील दैनिक वर्तमान पत्रात जाहीर प्रसिद्ध करावा ('अ' व 'ब' वर्ग संस्थासाठी) 'क' वर्ग संस्थांसाठी एकत्रितरित्या एका पेक्षा जास्त सहकारी संस्थाचे निवडणूक कार्यक्रमाची प्रसिद्धी बातमीव्दारे वर्तमान पत्रात दयावी आणि निवडणूक नियमातील तरतुदीनुसार ही प्रसिद्धी संस्थेचे / निबंधकाचे कार्यालयातील सुचना फलकावर प्रसिद्ध करावा. सर्व पंचांसमक्ष फलकावर प्रसिध्दीस डकविताना मोबाईल फोन मध्ये फोटोही काढून संग्रही ठेवावा. तसेच पंचनाम्याची प्रत उपरोक्त नमुद प्रमाणे दप्तरी ठेवावी. सदर निवडणूक कार्यक्रम वेबसाईट वरही प्रसिद्ध करावा.

ii. निवडणूक कार्यक्रमासाठी नियम ३(i) अन्वये इतर विभागाचे /स्थानिक स्वराज्य संस्थांचे / सहकारी संस्थांचे अधिकारी/कर्मचारी यांची नेमणुक करावी त्यांना प्रशिक्षणही द्यावे. जेणेकरुन सहकार विभागाचे अधिकारी/कर्मचारी विनाकारण गुंतून पडणार नाहीत.

iii. निवडणूक खर्च विहीत पद्धतीने करावा. मा.जिल्हाधिकारी यांचेकडून नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी विहित पध्दतीचे पालन करून तयार केलेल्या दरसुचीचा (Ratelist) अवलंब करावा. तसेच जी बाब दरसुचीत नाही त्याबाबत ४-५ कोटेशन घेऊन कमी दर असलेले कोटेशन मंजूर करावीत.

खर्चात काटकसर करणेचे धोरण ठेवावे. अनाठायी खर्च होऊ देऊ नये याची दक्षता घ्यावी. करण्यात आलेल्या सर्व खर्चाचे दस्ताऐवज व्यवस्थित जतन करुन ठेवावेत.

iv. मतदान पूर्ण होऊन मतमोजणीनंतर निकाल घोषित झालेवर त्याची प्रत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे मार्फत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्राधिकरणास तीन दिवसांचे आत पाठवावी.

V) **संकिर्ण :-**

जिल्हा /तालुका /प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने संस्थानिहाय धारीका जतन करुन ठेवावी. त्यात खालील बाबी प्रामुख्याने असाव्यात.

१. सहकारी संस्थेची प्राथमिक मतदार यादी
२. प्राथमिक मतदार यादीवर आलेले आक्षेप पंचनाम्यासह/ प्रसिद्ध कात्रणासह.
३. आक्षेपांना दिलेली उत्तरे.
४. अंतिम मतदार यादी - पंचनाम्यासह/प्रसिद्धी कात्रणासह.
५. प्राधिकरणाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे मंजुरीचे आदेश.
६. प्राधिकारणाचे निवडणूक कार्यक्रम मंजुरीचे आदेश.
७. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घोषित केलेल्या निकालाची प्रत.
८. निबंधकाने निवडून आलेल्यांची अधिसुचनांची प्रत.
९. संस्थेने निवडणूक निधी जमा किती केला त्याचा तपशील.
१०. निवडणूक खर्चाचे प्राधिकरणाने विहीत केलेले विवरणपत्र व त्याच्या पुष्ठयर्थ सर्व देयके.
११. निवडणूक निधी शिल्लक राहील्यास तो परत केल्याचा तपशील.

**(डॉ.आनंद जोगदंड)** 14/1/15
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण.

प्रती :
१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व).
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व).

प्रत सस्नेह :
१. मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे.
२. मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे,साखर संकुल शिवाजीनगर,पुणे.
३. मा.संचालक,हातमाग यंत्रमाग व वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य नागपुर.
४. मा.आयुक्त, आदिवासी विकास,आदिवासी भवन,म.रा.पुणे.
५. मा.आयुक्त,दुग्ध व्यवसाय विकास,म.रा.मुंबई, वरळी सी-फेस, मुबंई
६. मा.आयुक्त मत्सालय,म.रा.मुंबई,तारापोरवाला अक्वारीया,चर्नी रोड मुंबई.

**(डॉ.आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण.